महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे इत्यादिबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.५/का.५
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल : sec.corp@mah.gov.in
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२५

वाचा : राज्य निवडणूक आयोगाचे सम क्रमांकाचे दि. ०६ जुलै, २०२२ रोजीचे आदेश.

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि. ०६ जुलै, २०२२ च्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी तीन सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत तसेच इतर बाबींसाठी तरतूद करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने दि. १८ मार्च, २०२४ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात दुरुस्ती करुन बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिकांच्या निवडणुकांकरीता चार सदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे. त्यामुळे प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे किती प्रभाग राहतील यासंदर्भातील सुधारीत आदेश देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी आता, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन

राज्य निवडणूक आयोगाचे उपरोक्त दि. ०६ जुलै, २०२२ चे आदेश रद्द करुन खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता ६ ते ८ प्रभागांकरीता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

२) राज्यातील इतर महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता ३ ते ४ बहुसदस्यीय प्रभागांकरीता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

३) महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये महापालिका आयुक्त, उपजिल्हाधिकारी पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही, अशा अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करतील.

४) अपवादात्मक परिस्थितीत सार्वत्रिक निवडणुकीकरीता अन्य महानगरपालिकेमधील उपायुक्त यांना (उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेला) अथवा पोट निवडणुकीसाठी महानगरपालिकेच्या कार्यालयातील उपायुक्त यांना (उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेला), निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर महानगरपालिकेच्या संबंधित अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना, परिपत्रकातील तरतुदीनुसार निवडणुकीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी राहील.

५) निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नेमतांना विभागीय आयुक्त यांनी राज्य निवडणूक आयोगाने दि. १६ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या आदेशातील निकष पाळणे बंधनकारक राहील. तसेच खालील बाबींची देखील खात्री करण्यात यावी :-

(i) संबंधित अधिकारी उत्कृष्ट, संशयातित सचोटी व नि:पक्षपातीपणे काम करणारे असावेत. त्यांचा कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर संबंध नाही याबाबतची खात्री करावी.

(ii) सदर अधिकाऱ्यांना योग्य व पुरेसे प्रशिक्षण द्यावे.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, नेमलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक सबबी देऊन रद्द करण्याचे प्रकार वारंवार घडतात व त्यामुळे नेमणुकांना विलंब होतो व निवडणुकांच्या कामात अडचणी निर्माण होतात. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नेमणुका करताना विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या वारंवार करण्यात येतात.

असे प्रकार टाळण्यासाठी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाने रोस्टर तयार करुन चक्रानुक्रमे नियुक्त्या कराव्यात. जेणेकरुन निवडणुकांमध्ये आळीपाळीने सर्वांच्या नियुक्त्या केल्या जातील.

(iv) एखाद्या अधिकाऱ्याकडील कामकाजाचे स्वरुप अथवा त्याची नियुक्ती रद्द करण्याचे कारण पाहता, त्यावेळी त्या अधिकाऱ्याला निवडणूक कामकाज देणे शक्य नाही अशी विभागीय आयुक्त यांची खात्री झाल्यास, इतर अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल. मात्र त्यानंतर येणाऱ्या पुढील निवडणुकांमध्ये अशा नियुक्ती न केलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती न चुकता होईल याची दक्षता विभागीय आयुक्त यांनी घ्यावी.

(v) जर एखादा अधिकारी निवडणुकीचे कामकाज हेतुपुरस्सर टाळण्याचा प्रयत्न करीत असल्याची विभागीय आयुक्त यांची खात्री झाल्यास, अशा अधिकाऱ्यास निलंबित करुन त्याचा अहवाल त्यांनी राज्य निवडणूक आयोगास तात्काळ सादर करावा.

६) निवडणूककामी महानगरपालिका आयुक्तांना उप जिल्हाधिकारी/उपायुक्त व तहसिलदार संवर्गातील अधिकारी उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील. मात्र त्यांच्या नेमणुकीचे आदेश संबंधित महानगरपालिका आयुक्त काढतील.

७) महानगरपालिका आयुक्त पुढे नमूद केल्याप्रमाणे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करतील. तसेच प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

अ) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १** - हा अधिकारी तहसिलदार संवर्गातील असेल व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार पार पाडावयाच्या कामकाजात मदत करेल.

ब) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २** - हा अधिकारी महानगरपालिकेच्या कार्यालयातील तहसिलदार पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अन्य अधिकारी असेल. तो मतदान केंद्राची पाहणी करणे व तेथे योग्य त्या सोयीसुविधा पुरविणे, मतदान व मतमोजणी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, साहित्य वाटप, इ. बाबत

आवश्यक ती कार्यवाही करेल. आचारसंहितेशी संबंधित कामकाज पार पाडण्यासाठी हा अधिकारी आचारसंहिता कक्षाबरोबर योग्य तो समन्वय साधेल.

क) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३** - हा अधिकारी महानगरपालिकेच्या कार्यालयातील नायब तहसिलदार पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अन्य अधिकारी असेल. तो निवडणूक व्यवस्थापनांतर्गत महानगरपालिकेची वेबसाईट अद्ययावत करणे, त्यावर वेळोवेळी उमेदवारांची प्रतिज्ञापत्रे अपलोड करणे, वृत्तपत्रांची कात्रणे व इतर माहिती अपलोड करणे, तसेच राज्य निवडणूक आयोगास विहित नमुन्यामधील माहिती वेळोवेळी सादर करणे, इ. अनुषंगिक कामे करेल.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ व २ हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कोणतीही कर्तव्ये पार पाडू शकतील. परंतु नामनिर्देशनपत्राची छाननी करणे याच्याशी संबंधित असलेल्या आपल्या कामांपैकी कोणतेही काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी अनिवार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ झाला नसेल तर, कोणताही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्राची छाननीशी संबंधित कामांपैकी कोणतेही काम पार पाडणार नाही.

८) आचारसंहिता कक्ष - महानगरपालिका आयुक्त निवडणूक आचारसंहितेशी संबंधित सर्व कामकाज हाताळण्यासाठी आचारसंहिता कक्ष स्थापन करतील. तसेच सदर कक्षाचा प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी संवर्गातील एका अधिकाऱ्याची नियुक्ती करतील. आचारसंहितेशी संबंधित सर्व कामकाज या कक्षाकडून हाताळण्यात येईल.

९) उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचा हिशोब - महानगरपालिका आयुक्त निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेल्या निवडणूक खर्चाचा हिशोब तपासण्याकरीता किमान एक व कमाल तीन कक्ष स्थापन करतील व या कक्षामध्ये लेखाधिकारी वर्ग-१ या संवर्गातील एका अधिकाऱ्याची कक्ष प्रमुख म्हणून नियुक्ती करतील. उमेदवारांनी सादर केलेल्या दैनंदिन व एकत्रित खर्चाचे हिशोब या कक्षामार्फत तपासण्यात येतील.

१०) महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी महापालिका आयुक्त यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची नेमणूक, सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची नेमणूक तसेच या आदेशात नमूद केल्याप्रमाणे

अन्य कामांसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे ही संबंधित विभागीय आयुक्त यांची जबाबदारी राहील.

११) नियंत्रण - महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त हे "निवडणूक अधिकारी " म्हणून काम पाहतील. सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक तसेच निवडणुकीशी संबंधित इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे निवडणूक अधिकाऱ्यांच्या म्हणजेच महानगरपालिका आयुक्त यांच्या नियंत्रण आणि पर्यवेक्षणाखाली काम करतील.

सदर आदेश राज्य निवडणूक आयोगाच्या www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) 06.05.2025

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व महानगरपालिका आयुक्त.
३. सर्व विभागीय आयुक्त.
४. सर्व जिल्हाधिकारी.
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने.
६. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
७. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
८. निवड नस्ती.